UGC Approved Sr. No. 49366


SRJIS

Online ISSN -2278-8808

Printed ISSN- 2349-4766

GLOBALLY INDEXED

IMPACT FACTOR SJIF 2016 6.177




An International Peer Reviewed

Referred Quarterly

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

OCT-DEC, 2017. VOL. 6, ISSUE -34

EDITOR IN CHIEF : YASHPAL D. NETRAGAONKAR, Ph.D.

5

Scanned with OKEN Scanner

326 भारतीय अर्थव्यवस्थेवरील 'विमुद्रीकरण' परिणामांचे अध्ययन
*प्रा. डॉ. ज्ञानेश्वर एन्. सोनवणे (1476-1481)*

327 भारतातील कृषी क्षेत्रासमोरील आव्हाने
*प्रा. डॉ. सुनिल मोहटे (1482-1486)*

328 रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, अलिबाग ही एक रायगड जिल्ह्यातील स्वयंसहाय्यता बचत गटांना प्रोत्साहित करणारी संस्था
*प्रा. लोहकरे शत्रुघ्न नामदेव & प्रा. डॉ. मनिषा कर्णे (1487-1494)*

329 ***कृषी अर्थशास्त्र महाराष्ट्रातील तेलबियांचे लागवडीखालील क्षेत्र आणि उत्पादन यांचे विश्लेषण (२०१० ते २०१६)***
*प्रा. विश्वनाथ गजानन कोटकर (1495-1499)*

330 ***आदिवासी समाजाच्या समस्या***
*अंजली पंढरीनाथ लंगोटे (1500-1503)*

331 नवीन अर्थिक सुधारणानंतरचे भारताचे परकिय व्यापार धोरण
*प्रा. सुहास सुदाम क्षिरसागर (1504-1508)*

332 महिला सबलीकरणाचा सुकर मार्ग : स्वयंसहाय्यता बचत गट
*डॉ. अंजली रामचंद्र कदम – नारायणे (1509-1511)*

333 महाराष्ट्रातील पशुधन
*श्रीमती होन कविता संपत (1512-1515)*

334 जीएसटी— वस्तु व सेवा कर
*गुजर तृप्ती द्वारकनाथ (1516-1518)*

335 भारतीय शेतमजुरांच्या समस्यांचा अभ्यास
*डॉ. शिवाजी झांझुरणे & प्रा. डॉ. अरूण तवार (1519-1526)*

336 अहमदनगर जिल्हाच्या आर्थिक विकासात ग्रामपंचायतींची भुमिका
*कडलग सुवर्णा उत्तमराव & प्रा. डॉ. भोसले आर. डी. (1527-1530)*

337 भारतीय कर व्यवस्थेतील एक क्रांतिकारी बदल; जीएसटी
*डॉ.सदाशिव सिताराम मेंगाळ (1531-1534)*

338 प्राथमिक सहकारी दूध विकास संस्थांच्या कामगिरीचे अध्ययन
*डॉ. नितिन अशोक मुटकुळे (1535-1537)*

339 महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र योजनेचा रोजगार निर्मितीमधील योगदानाचा अभ्यास
*गणेश मच्छिद्र चोर (1538-1540)*

340 सेंद्रिय शेतीचे महत्त्व
*प्रा. डॉ. किशोर रंगनाथ डोंगरे & प्रा.प्रविण बबनराव आहेर (1541-1544)*

341 **DEMONETIZATION AND CASHLESS TRANSACTIONS**
*Dr. Narayan N. Gadhe (1545-1547)*


Scanned with OKEN Scanner

ISSN: 2349-4766 (P), 2278-8808 (E)
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES



# भारतीय अर्थव्यवस्थेवरील 'विमुद्रीकरण' परिणामांचे अध्ययन

**प्रा. डॉ. ज्ञानेश्वर एन्. सोनवणे**
*सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुखक. भा. हिरे कला महाविद्यालय निमगांव, ता. मालेगांव जि. नाशिक*

**प्रस्तावना :—** विनियमाचे (देवाण—घेवाण) स्विकारार्ह माध्यम म्हणून विशिष्ट चलन किंवा मुद्रा वापरली जाते. चलन हे नाणी व नोटांच्या स्वरूपात असून देशातील वित्तव्यवस्थेचा भौतिक पैलू असते. शेरशाह सूरीच्या (१५४०—१५४५) काळापासून प्रचलित असणारा 'रूपया' आज हे भारताचे 'राष्ट्रीय चलन' म्हणून आहे. नोव्हें. २०१६ पर्यंत भिन्न मुल्य असलेली नाणी (१,२,५,१० रूपये) व बॅक नोट अथवा कागदी चलन (१०,२०,५०,१००,५००,१०० रूपये) प्रचलित होते. भारतीय रिझार्व बॅंकेच्या अहवालानुसार ३१ मार्च २०१६ रोजी देशात एकूण १६.४५ लाख कोटी रूपये मुल्याच्या बॅक नोटांमध्ये ५०० व १००० रूपये उच्च मुल्याच्या एकूण १४.१८ लाख कोटी रूपये म्हणजे ८६.३६ टक्के इतके प्रमाण अधिक होते. या उच्च मुल्याच्या कागदी नोटांचा वापर भ्रष्टाचार, काळा पैसा निर्मितीसाठी, आतंकवाद व नक्सलवादास रसद पुरविणेसाठी, नकली नोटा निर्मितीसाठी होवून देशाच्या आर्थिक विकासाला मारक ठरत होता. म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ८ नोव्हे. २०१६ रोजी ५०० व १००० रूपयेच्या चलनाचे विमुद्रीकरण अर्थात नोटबंदी, चलनबंदी करण्याची घोषणा केली. सुरूवातीच्या काळात सर्व स्तरातून सकारात्मक प्रतिक्रीया तर सत्ताधारी कडून जय—जयकार केला जात होता. मात्र ४८ तासानंतर एटीएम मधील पैसा संपून बॅकांसमोर रांगा लागल्या. तेव्हा राजकारणी, राजकीय पंडीत, अर्थतज्ञ, बुध्दीवंतांमध्ये विमुद्रीकरण परिणामांबाबत वाद—विवाद होवू लागले. अर्थव्यवस्थेचे सुदृढीकरण होईल (अरूण जेठली), काळयापैशावर प्रहार होण्याचे योग्य साधन (अरविंद विरमणी), अर्थव्यवस्थेतील सर्वात मोठी आर्थिक सुधारणा आहे (सुरजीत भल्ला), भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी होईल (आदी गोदरेज), विमुद्रीकरणाच्या माध्यमातून शासनाची संघटीत लूट आहे (डॉ. मनमोहनसिंग), नवीन स्वरूपात काळा बाजारास चालना मिळणार (कौशिक बसू), रियल इस्टेट, ज्वेलरी, शेअर बाजार इत्यादी माध्यमात काळापैसा सामावलेला असतांना विमुद्रीकरणातून काळापैसा मिळणार नाही (अरूण शौरी), विमुद्रीकरण हा देशातील सर्वात मोठा घोटाळा आहे (पी. चिदंबरम),



Scanned with OKEN Scanner

 ISSN: 2349-4766 (P), 2278-8808 (E)

ऑटोमोबाईल क्षेत्रावर विपरीत परिणाम (मुडीज), रियल इस्टेट क्षेत्रावर विपरीत परिणाम होतील (बिझनेस स्टॅन्डर्ड) अशा पार्श्वभूमीवर जनसामान्य माणसात संभ्रमाचे वातावरण निर्माण झालेले असतांना भारतीय अर्थव्यवस्थे वरील विमुद्रीकरण परिणामांचे अध्ययन हे उपयुक्त ठरणारे आहे.

**अध्ययनाचे उद्देश :—**

१) भारताच्या चलन व्यवस्थेतील त्रूटींचे अध्ययन करणे.

२) भारतीय अर्थव्यवस्थेवरील विमुद्रीकरणाच्या सकारात्मक परिणामांचे अध्ययन करणे.

३) भारतीय अर्थव्यवस्थेवरील विमुद्रीकरणाच्या नकारात्मक परिणामांचे अध्ययन करणे.

४) विमुद्रीकरण विषयी जनसामान्यांच्या संभ्रमाचे निराकरण करणे.

**अध्ययन पध्दती :—** प्रस्तुत अध्ययन हे दुय्यम तथ्य संकलन स्त्रोतावर आधारीत आहे. वृत्तपत्रे, मॅगेझीन्स ई बुक्स, संकेतस्थळे इत्यादीच्या माध्यमातून मिळालेल्या माहितीचे संकलन व वर्गीकरण करून परिणामांचे अध्ययन मांडण्यात आलेले आहे.

**चलनाचे विमुद्रीकरण :—** विमुद्रीकरण यास नोटबंदी, चलनबंदी म्हणून संबोधन आहे. विमुद्रीकरण म्हणजे चलनातील बॅंक नोट रद्द करणे अथवा बंद करणे असा साधा अर्थ घेतला जातो. थॉर्प ॲन्ड थॉर्प (२०१०) यांच्यामते 'काळ्या बाजारातील तसेच बेहिशोबी पैशावर हल्ला चढविणेसाठी चलन बाजारातून काढून घेणे'. जॉन इटवेल पालग्रेव्हच्या राजकीय तज्ञाने 'एखाद्या नाण्याचा अथवा कगादी चलनाचा उपयोग शासनाने थांबविणे आणि अधिकृतपणे ते चलनातून काढून टाकणे म्हणजे विमुद्रीकरण'. अर्थात प्रचलित चलनाची कायदेशीर मान्यता रद्द करणे, प्रचलीत चलनातील विशिष्ठ मुल्याच्या नोटांचे विनिमय मुल्य शुन्य करणे. एखाद्या चलनाची विनिमय वैधता समाप्त करणे म्हणजे विमुद्रीकरण होय. १९६९ मध्ये अमेरिका, १९८७— मॅनमार, १९९०—झैरेन, १९९६ — ऑस्ट्रेलीया, २०१०— झिम्बाब्वे व उत्तर कोरीया मध्ये चलनाचे विमुद्रीकरण करण्यात आले. भारतात १२ जाने. १९४६ रोजी १०००, ५०००, १०००० रूपयेच्या चलनाचे, १६ जाने. १९७८ मध्ये १०००, ५००० व १०००० रूपयेच्या चलनाचे पुन्हा विमुद्रीकरण करण्यात आले. परंतु विमुद्रीत चलनाचे प्रमाण कमी असून विमुद्रीकरण यशस्वी झाले नाही. मात्र ८ नोव्हें. २०१६ मधील तत्कालीन ५०० व १००० रूपयेच्या चलनाचे मुल्य एकूण चलनात ८६.३६ टक्के इतके अधिक असल्याने विमुद्रीकरण हे आर्थिक सर्जिकल स्ट्राईक, अर्थव्यवस्थेतील त्सुनामी मानले जात आहे.

**चलन व्यवस्थेतील त्रूटी :** अर्थतंज्ञांच्या मते सुरक्षा हेतूने प्रत्येक देशात विशिष्ट कालावधीनंतर म्हणजे दर पाच वर्षांनी बॅंक नोटांमधील कमी—अधिक प्रमाणात


Scanned with OKEN Scanner

बदल करणे आवश्यकच असते. परंतु भारतात १९८७ नंतर ५०० व १००० रूपयेच्या बॅक नोट मध्ये बदल करण्यात आले नाही. बनावट नोटा निर्माण करून भारतीय अर्थव्यवस्थेत मोठया प्रमाणात प्रसार करण्यात आणि बनावट चलनाची समांतर चलनव्यवस्था निर्माण करणे, शत्रू राष्ट्रांना शक्य झाले. तसेच उर्जीत पटेल (रिझर्व बॅक गव्हर्नर व शशिकांत दास (आर्थिक व्यवहार सचिव) यांच्या संयुक्त निवेदनानुसार २०११ ते २०१६ या कालावधीत एकूण चलनात ४० टक्के नी वृध्दी होवून ५०० व १००० रूपये चलनातील वृध्दी अनुक्रमे ७६ टक्के व १०९ टक्के इतकी अधिक होती. त्यामुळे याच काळात प्रचंड आणि महाप्रचंड घोटाळे झाले. काळयापैशाची एक समांतर अर्थव्यवस्था निर्माण होवून अर्थव्यवस्थेस मोठा धोका निर्माण झाला. अर्थक्रांतीचे अनिल बोकील यांच्यामते आपल्या देशातील दरडोई उत्पन्नाचा विचार करता ५० रूपये पेक्षा उच्च मुल्याची नोट नको. कारण अमेरिकेत ४० हजार डॉलर दरडोई उत्पन्न असतांना फक्त १०० डॉलर हे उच्च मुल्याचे चलन आहे. म्हणजे दरडोई उत्पन्नाचे मोठया नोटेशी असलेले प्रमाण ४०० पट आहे. भारतात हजार रूपये दरडोई उत्पन्न असतांना १००० रूपये मुल्याची नोट हे प्रमाण फक्त २३ इतकेच आहे.

**भारतीय अर्थव्यवस्थेवरील विमुद्रीकरणाचे परिणाम :**

१) जागतिक बॅकेच्या अहवालानुसार भारतात GDP च्या २७ टक्के पेक्षा अधिक तर वांच्छू, चोप्रा, रांगणेकर समितींच्या वेगवेगळया अहवालानुसार अर्थव्यवस्थेच्या १/४ भाग काळापैशाने व्यापलेला आहे. अर्थात २.५ ते ३.० लाख कोटी रूपयेचा काळापैसा आहे. i) अरूण जेठलीं यांच्या मतानुसार नोटबंदीनंतर २ लाख कोटी रूपयाचे बॅक व्यवहार संशयास्पद असून त्याची चौकशी होत आहे. ii) ३५००० कोटी रूपये अर्थव्यवस्थेत परत आले नाही. iii) १५०० कोटी रूपयाचे चलन नष्ट करण्यात आले. म्हणजे काळापैसा काही प्रमाणात नष्ट होणेस मदत झालेली आहे.

२) नकली अथवा बनावट चलन हे आर्थिक छद्मी युध्दाचे एक प्रमुख हत्यार असल्याने शेजारी राष्ट्र प्रतिवर्षी भारतीय अर्थव्यवस्थेत सरासरी ४०० ते ५०० कोटी रूपयाचे नकली चलन समाविष्ठ करीत होते. RBI च्या अहवालानुसार मार्च २०१६ अखेर अर्थव्यवस्थेत ६३२.९२९ कोटी रूपयेचे ५०० व १००० रूपयेचे नकली चलन होते. हे सर्व नकली चलन नोटबंदीमुळे व्यवहारातून बाद होवून अधिकृत चलनावरील विश्वास वृध्दींगत होणेस चालना मिळाली.



Scanned with OKEN Scanner

३) भारतात बनावट नोटा व हवाला व्यवहारांच्या माध्यमातून शत्रुराष्ट्र, आतंकवादी व नक्सलवादी कारवायांना 'आर्थिक रसद' पुरवित होते. दगडफेक, जाळपोळ, गोळीबार, बॉम्बस्फोट, आत्मघाती हल्ले करणेसाठी उपयोग करीत होते. परंतु i) नोटबंदीनंतर ६० टक्के आतंकवादी घटनांमध्ये ii) ५० टक्के हवाला व्यवहारांमध्ये घट झाली. iii) मावोवादयांकडून ९० लाख रूपयेचे नकली चलन जप्त करणेत आले. iv) काश्मिर खोऱ्यात ७. ६२ लाख बनावट नोटाचे तुकडे सापडले. v) माओवादी चळवळ अडचणीत येवून माओवादी आत्मसमर्पण संख्येत वाढ झालेली आहे. परिणामी देशातील शांतता व सुव्यवस्था वृध्दींगत होण्यास मदत होणार आहे.

४) प्राइसवॉटर कुपर संस्थेच्या २०१५ च्या अहवालानुसार भारतीय अर्थव्यवस्थेत ७८टक्के व्यवहार हे रोख चलनात होतात. त्यामुळे भ्रष्टाचारास व काळयापैशास वाव मिळतो. ट्रान्सपरेन्सी इंटरनॅशनलच्या अहवालानुसार भारत भ्रष्टाचाराबाबत १७६ देशात ७४ व्या क्रमांकावर आहे. २०१६ मध्ये ७९ वा क्रमांक होता. नंदन निलकेनी यांच्यामते नोटबंदीमुळे डीजीटल व्यवहारांना चालना मिळून भ्रष्टाचार प्रमाण कमी होईल या दृष्टीने i) ऑगस्ट २०१६ ते ऑगस्ट २०१७ या काळात ८७ कोटी वरुन १३८ कोटी म्हणजे ५८.९१ नी वाढले. ii) डेबीट कार्डच्या सहाय्याने होणारे वयवाहर ४९ टक्के, iii) IMPS व्यवहार प्रमाण ५९ टक्के ने वाढ झाली. iv) २०१२ च्या अर्थमंत्रालय श्वेतपत्रिकेनुसार चलनाच्या निर्मिती व कार्यान्वयनासाठी वार्षिक २१००० कोटी रूपये खर्च करावा लागतो. त्याची बचत होण्यास मदत होईल. म्हणजे अर्थव्यवस्थेतील व्यवहारात पारदर्शकता वाढणेस मदत होणार आहे.

५) देशातील उद्योग, व्यापार व बॅंक व्यवहार ही वित्तीय व्यवस्था पारदर्शक स्वरूपाची असणे आवश्यक असतांना देशातील वित्तीय व्यवस्था अत्यंत संशयास्पद व काळापैसा निर्मितीस सहाय्य करणारी, विषमता वाढविणारी, अनैतिक लूट करणारी होती. i) विमुद्रीकरणानंतर बॅंकेतील १७.७३ लाख संशयीत खात्यांची ओळख झाली. ज्या खात्यातील ठेवी व करभरणा प्रोफाईल जुळत नाही ii) २३.२२ लाख बॅंक खातेदारांची ३.६८ लाख ठेवी संशयाच्या भोवऱ्यात आहेत iii) २.०९ लाख बोगस कंपन्यांची शासनाने नोंदणी रद्द केली.

६) विमुद्रीकरण घोषणेनंतर स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका वीज महामंडळे, प्राथमिक सहकारी सोसायटया

 ISSN: 2349-4766 (P), 2278-8808 (E)

या सारख्या संस्थांचा थकीत वसुल वाढून यासारख्या संस्थांना उर्जीतावस्था प्राप्त झाली.

७) सहकारी बॅंकांसह राष्ट्रीयकृत बॅंकांमध्ये ठेवींचे प्रमाण वाढून कर्जावरील सर्व प्रकारात घट होवून कर्ज स्वस्त होण्यास चालना मिळाली आहे. त्यामुळे उद्योग, व्यवसाय व रियल इस्टेट क्षेत्रात गुंवतणूक वाढणेस चालना मिळेल.

८) विमुद्रीकरणानंतर करदात्याच्या संख्येत व कर महसुलात वाढ झाली. कर फाईल करणाऱ्यांच्या संख्येत २५ टक्के तर करमहसुलात २० टक्के नी वाढ झाली.

**विमुद्रीकरणाचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील नकारात्मक परिणाम —**

१) अर्थव्यवस्थेच्या जीडीपी मध्ये ६.६ टक्के वरून ५.७ टक्के पर्यंत घट होण्यामुळे अर्थव्यवस्थेचे १,३०,००० कोटी रूपयाचे आर्थिक नुकसान झाले.

२) विमुद्रीकरणानंतर २००० रूपये मुल्याच्या नोटा छापण्याचा खर्च ८००० कोटी रूपये अनाठायी स्वरूपात करण्यात आला.

३) भारतीय रिझर्व बॅंकेकडून केंद्रशासनाला डिव्हीडंट उत्पन्न स्वरूपात २०१५–१६ मध्ये ६५८७५ कोटी रूपये प्राप्त झाले होते. विमुद्रीकरणानंतर २०१६–१७ या वर्षात फक्त ३०६९५ कोटी रूपये प्राप्त होवून ३५००० कोटी रूपये इतकी महसुलात घट झाली.

४) भारतीय रिझर्व बॅंकेला अंतर्गत साधनांच्या सहाय्याने मिळणाऱ्या उत्पन्नात विमुद्रीकरणानंतर १०००० कोटी रूपयाची घट झाली.

५) भारतीय अर्थव्यवस्थेच्या एकूण बचतीत ६२ टक्के बचत ही काटकसरीतून प्राप्त झालेल्या Fixed Deposit स्वरूपात असते. विमुद्रीकरणानंतर Fixed Deposit करणारे व प्रामुख्याने पेन्शनरच्या बचतींवरील व्याजदर कमी होवून आर्थिक हानी वाढलेली आहे.

६) भारतीय मजदूर संघ (भाजपप्रणीत) च्या अनुमानानुसार विमुद्रीकरणानंतर अर्थव्यवस्थेतील २.३० लाख लघू उद्योग बंद झालेले आहेत.

७) विवके कौल यांच्यानुसार विमुद्रीकरणानंतर अर्थव्यवस्थेतील १५ लाख नोकरी / रोजगाराचे प्रमाण कमी होवून बेरोजगारीचे प्रमाण वाढले आहे.

८) बिझनेस स्टॅंर्डडच्या डिसेंबर २०१६ च्या अहवालानुसार विमुद्रीकरणानंतर रियल इस्टेट क्षेत्रातील व्यवहारात ६० टक्के पर्यंत घट झालेली आहे. FMCG उत्पादनात व विक्रीत २० ते ३० टक्के घट झाली.



Scanned with OKEN Scanner

९) प्रणव सेन यांच्यानुसार भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनात ४५ टक्के व रोजगारात ४० टक्के हिस्सा असणाऱ्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात २०१८ मध्ये मोठी घट संभवते.

१०) मुडीजच्या अहवालानुसार ऑटोमोबाईल क्षेत्रावर विपरीत परिणाम होत आहेत.

**सारांश :—**

विमुद्रीकरणाचा निर्णय हा भारत सरकारचा अत्यंत धाडसी निर्णय आहे. त्यामुळे दिर्घकाळासाठी अर्थव्यवस्थेच्या सुदृढ वाढीसाठी चालना मिळणार आहे. परंतु या निर्णयाचे अल्पकाळासाठी अर्थव्यवस्थेत अडचणी व नकारात्मक परिणम दिसून येत आहेत.

**संदर्भ :—**

१) योजना, फेब्रुवारी २०१७
२) करंट अफेअर्स, ई—बुक, १७ डिसेंबर २०१७
३) इंडीया टूडे, ४ जाने. २०१७
४) जागरण जोश, करंट अफेअर्स, सप्टे. २०१६
५) हिंदुस्थान टाईम्स, २ फेब्रु. २०१७
६) बिझनेस स्टॅन्डर्ड, १३ फेब्रु. २०१७
७) महाराष्ट्र टाईम्स, ७ डिसे. २०१३
८) इकॉनॉमिकल टाईम्स, २४ डिसें. २०१६
९) इंडीयन एक्सप्रेस, १३ डिसें. २०१६
१०) www.transparency.org
११) www.jagaranjosh.com
१२) www.pravakta.com
१३) https://mr.m.wikipedia.org



Scanned with OKEN Scanner